# MAHARASHTRA STATE COUNCIL
## FOR OCCUPATIONAL THERAPY & PHYSIOTHERAPY, MUMBAI
## महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई

**St. George'sHospital, Behind C.S.T. Station, Ph. 22620408**

**Email ID-**otptcouncil@gmail.com www.mahaotandptcouncil.in


जा.क्र.ओटीपीटी/परिषद /२०२१/४१४२ दि. ०६ / ०५ /२०२१

**वृत्तांकन टिपणी ( प्रेस नोट)**

**प्रति,**

सर्व माध्यम प्रतिनिधी

**विषय: देवयानी पडोळे नागपुर यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्या च्या वृत्तांकनाबाबत**

**संदर्भ : नागपुर वृत्तपत्र व मराठी चॅनेलद्वारे प्रसारित करण्यात आलेली बातमी.**

**सीतबर्डी पोलिस ठाणे, नागपुर** यांच्याद्वारे **नागपुर** येथील **देवयानी पडोळे व इतर यांच्यावर रेम्डेसीवीर च्या काळाबाजार केल्याबाबत** गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे समजते. संबंधित प्रकरणाचे वृत्तांकन करत असताना सदरील महिला ही सेवाग्राम वर्धा येथे फिजिओथेरपीस्ट असल्याचे नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदरहू महिलेने आपण सेवाग्राम वर्धा येथील रुग्णालयात फिजिओथेरपीस्ट म्हणून कार्यरत असल्याचे पोलिस जबाबात नमूद केले असल्याचे प्रथमदर्शनी समजते.

महाराष्ट्र अधिनियम २००४(२) मुख्य अधिनियम या परिषद कायद्याअंतर्गत तयार केलेल्या नोंदवहीचे अवलोकन केले असता अशा नावाची कोणतीही व्यक्तिची फिजिओथेरपिस्ट म्हणून नोंदणी झाली नसल्याने **सदरील महिला फिजिओथेरपिस्ट नसल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे सर्व माध्यम प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की सदरील प्रकरणाचे वृत्तांकन करताना सदरील महिलेचा फिजिओथेरपिस्ट म्हणून उल्लेख टाळावा**. सदरील व्यक्तीमुळे फिजिओथेरपी शाखेची बदनामी होऊन या वैद्यकीय शाखेबाबत गैरसमज पसरण्यात येवू नये याची आपण खबरदारी घ्यावी.

**फिजिओथेरपी शाखेची बदनामी करणे, फिजिओथेरपिस्ट नसताना असल्याचे भासवणे, यासाठी महाराष्ट्र अधिनियम २००४ (२) मुख्य अधिनियम या परिषद कायद्याअंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया संबंधित पोलिस अधिकारी सीतबर्डी पोलिस ठाणे यांच्याशी चर्चा करून या परिषदेद्वारे सुरू केलेली आहे.** या बाबतचे वृत्तांकन आपल्या प्रसिद्ध वृत्तपत्र व चॅनेल द्वारे प्रसारित करावे ही विनंती. तसेच बोगस फिजिओथेरपी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची आपणास माहिती मिळाल्यास या कार्यालयास कळवावे.

या प्रकरणी आपले योगदान आवश्यक आहे. धन्यवाद.

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई